**खनिज विकास निधी अंतर्गत मान्यता प्राप्त कामांसाठी महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळास निधी उपलब्ध करून देण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## उद्योग, उर्जा व कामगार विभाग

## शासन निर्णय क्रमांकः एमडीएफ-१०१६/प्र.क्र.८५/उद्योग-९

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

तारीख: २९ मार्च, २०१९

**वाचा :-** संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचे पत्र क्र.लेखा/ अर्थसंकल्प/ एमएसएमसी/४१९/भाग-२/२०१९, दिनांक १३.०३.२०१९.

**प्रस्तावना -**

खनिज विकास निधीच्या वापर व वाटपासंदर्भात शासनास निर्देश देण्याकरिता मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या राज्यस्तरीय समितीच्या दिनांक ०७ मे, २०१२ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार खनिज विकास निधीचा वापर व वाटपासंदर्भात सुधारीत मार्गदर्शक तत्वे विहित करणारा शासन निर्णय दिनांक ०१ ऑगस्ट, २०१२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वानुसार पात्र ठरणाऱ्या कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहेत. शासनाने मान्यता दिलेली कामे हाती घेण्यासाठी कार्यान्वयण यंत्रणांना निधी उपलब्ध करून देण्याकरिता महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळास निधी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय -

महाराष्ट्र खनिज विकास निधी मधून महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर यांना सन २०१८-१९ करिता अर्थसंकल्पीत केलेल्या रूपये ९.०० कोटी (रूपये नऊ कोटी फक्त) शासन या आदेशान्वये उपलब्ध करून देत आहे. प्रस्तुत रूपये ९.०० कोटी निधी ( रूपये नऊ कोटी फक्त) भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांना शासन निर्णय दिनांक ०१.०८.२०१२ च्या परिच्छेद ४ मध्ये नमूद विविध बाबींच्या प्रशासकीय खर्चासाठी उपलब्ध करून देण्यास या शासन निर्णयाद्वारे शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. या प्रयोजनासाठी अर्थसंकल्पीय तरतुद उपलब्ध असून सदर तरतुदीतून रूपये ९.०० कोटी (अक्षरी रूपये नऊ कोटी फक्त) खर्च भागविण्यात यावा आणि हा खर्च मागणी क्र.के- ७ प्रधान लेखाशीर्ष "२८५३, अलोह खनिकर्म व धातुविषयक उद्योग-०२ (००) (०५) खनिज विकास (योजनेतर) (२८५३ ०१३२) ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेतर) या शिर्षाखाली सुधारीत कॅशफ्लोनुसार खर्ची घालण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजना) अधिनियम, २००१ च्या कलम ५ (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्या.त आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०३२९१६४३१३१३१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay Shankarrao Ingle

Digitally signed by Sanjay Shankarrao Ingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f0d616600e4d2f510d1c8cc19813e070ad282d2275bf6fc132a2dee97f14e0a6, serialNumber=d337930b14433dc62c0154af2bbc60bb5a6edcaa66b7f34596c50a27eb0f6333, cn=Sanjay Shankarrao Ingle
Date: 2019.03.29 17:25:44 +05'30'

**( संजय इंगळे )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर.
२. संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता व लेखा परिक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
४. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
५. कक्ष अधिकारी, प्रशासन (१), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. निवडनस्ती (उद्योग-९)